Vol-13 Special Issue- 1.4 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# मानवता, शांतता व शाश्वत प्रगतीसाठी 'वसुधैव कुटुम्बकम'

**डॉ. ममता फुके**
सहाय्यक प्राध्यापिका
प्रियदर्शिनी शिक्षण महाविद्यालय प्लाट नं. 156, मनिष लेआऊट, सोनेगाव तलाव रोड, नागपूर

## गोषवारा

भारतीय तत्वज्ञानामुळे मानवतावाद आणि विश्व बंधुत्व यांना विशेष महत्व देण्यात आले आहे. 'वसुधैव कुटुम्बकम'ही संकल्पना संपूर्ण विश्वाला एक कुटुंब उदात्त कल्पना मांडते. या विचारानुसार व्यक्ती, समाज आणि समुदाय यांच्यात परस्पर सहकार्य, समता आणि जबाबदारी असणे आवश्यक आहे. आधुनिक काळातील सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय समस्यांचा पार्श्वभूमीवर या संकल्पनेचे महत्व अधिक वाढत आहे. संपूर्ण पृथ्वी हे एकच कुटुंब आहे. हा विचार मानवता, जागतिक शांतता आणि शाश्वत प्रगती यांचा समन्वय साधतो. आजचे जग विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिक प्रगतीमुळे एकमेकाच्या अधिक जवळ आले असले तरी युद्ध मूल्यांचा -हास यासारख्या गंभीर समस्यांनी ग्रासलेले आहे. अशा परिस्थितीत भारतीय तत्वज्ञानातील 'वसुधैव कुटुम्बकम'ही संकल्पना मानवता, शांतता व शाश्वत प्रगतीसाठी उपयुक्त ठरते. प्रस्तुत संशोधनात वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेची तात्विक पार्श्वभूमी, तिचे मानवतावादी स्वरुप, जागतीक शांततेतील योगदान, आधुनिक काळातील उपयुक्तता व भविष्यातील भूमिका यांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे.

**मुख्य शब्द :** वसुधैव कुटुम्बकम, मानवता, शांतता, जागतिक प्रगती, भारतीय तत्वज्ञान.

**प्रस्तावना :** एकविसाव्या शतकात विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकासामुळे मानवने मोठी भौतिक प्रगती साधली आहे. मात्र या प्रगती बरोबरच युद्धे, दहशतवाद, धार्मिक व वांशिक द्वेष, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक विषमता या समस्या अधिक तिव्र झाल्या आहेत. मानवी जीवन अधिक सोयीस्कर झाले असले तरी मानवी संबंध अधिक गुंतागुंतीचे व तणावपूर्ण झाले आहेत. या साठी मानवतेला एकत्र बांधुन ठेवणा-या मूल्यांची गरज प्रकर्षाने जाणवते. भारतीय तत्वज्ञानाने प्राचीन काळापासून मानवजातीला व्यापक दृष्टीकोन दिला आहे. ही संकल्पना मानवता केवळ एखाद्या राष्ट्रांचा नागरिक न मानता संपूर्ण घटक मानते. 'वसुधैव कुटुम्बकम' हा विचार महाउपनिषदातून आलेला आहे. संकुचित दृष्टिकोन ठेवणारे लोक स्वतःचा आणि परक्याचा भेद करतात तर उदार दृष्टीकोन असणारे लोक संपूर्ण जगाला एक कुटूंब मानतात. राष्ट्र, धर्म, भाषा, आणि संस्कृती यांच्या भिंती अधिक दृढ होत असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. या पार्श्वभूमीवर मानवतेचे सार्वत्रिक मूल्य जागतिक शांतता आणि शाश्वत प्रगतीसाठी एक व्यापक तत्वज्ञान आवश्यक आहे. यासाठी वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना मानवाला केवळ एखाद्या राष्ट्राचा नागरिक न मानता संपूर्ण विश्वाचा घटक मानतो. त्यामुळे मानवता, शांतता व प्रगती यांचा समन्वय साधण्यासाठी या संकल्पनेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

'वसुधैव कुटुम्बकम' या संकल्पनेचा तात्विक अर्थ स्पष्ट करणे.

मानवतेच्या विकासात या संकल्पनेचे योगदान विषद करणे.

जागतिक शांततेसाठी या संकल्पनेचे महत्व सांगणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

शाश्वत प्रगती व विकासाच्या संदर्भात 'वसुधैव कुटुम्बकम' या संकल्पनेची उपयुक्तता तपासणे.

## संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असून उपनिषद भगवदगीता, गांधीवादी विचार, आधुनिक संशोधन ग्रंथ, नियतकालिके आणि आंतरराष्ट्रीय अहवाल यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## वसुधैव कुटुम्बकम तात्विक पार्श्वभूमी :-

**संकल्पनेचा अर्थ:-** 'वसुधैव कुटुम्बकम' ही संकल्पना भारतीय तत्वज्ञानातील एक अत्यंत महत्वाची व वैश्विक दृष्टी देणारी विचारधारा आहे. या संकल्पनेचा स्तोत्र महापनिषद मध्ये आढळतो. ''वसुधा म्हणजे पृथ्वी 'एवं' म्हणजे निश्चयार्थी आणि 'कुटूबकमंम' म्हणजे कुटंब अर्थात संपूर्ण पृथ्वी हेच एक कुटुंब आहे हा विचार संकुचित स्वार्थ, भेदभाव व अहंकार यांना नाकारुन मानवजातीच्या ऐक्याची घोषणा करतो. भारतीय तत्वज्ञानाचा मूलभूत गाभा समन्वय, सह अस्तित्व व समस्टीकरण यावर आधारित आहे. उपनिषदांतील 'सर्व भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामय' हा मंत्र संपूर्ण सृष्टीचा कल्याणाची कामना करतो याच विचारांची परिपूर्ण अभिव्यक्ती म्हणजे वसुधैव कुटुम्बकम होय. येथे व्यक्तीपेक्षा समवटीला, तर स्वार्थपेक्षा परमार्थाला अधिक महत्व दिले आहे. म्हणजेच सामाजिक ऐक्य आणि वैश्विक बंधुत्वावर भर देते.

**अद्वैत वेदांताचा तात्विक आधार :-** अद्वैत वेदांतानुसार संपूर्ण विश्व एकाच ब्रम्हतत्वाची अभिव्यक्ती आहे. सर्व जीव एकाच तत्वातून उत्पन्न झाले आहे. त्यामुळे त्यांच्यात भेद करणे तात्विकदृष्ट्या अयोग्य ठरले. 'वसुधैव कुटुम्बकम' ही संकल्पना याच अद्वैत भावनेचा व्यवहार्य विस्तार करते. ब्रम्ह सत्य आहे, असा हा सिद्धांत आहे. जर सर्व जीव एकाच तत्वातून उत्पन्न झाले असतील तर त्यांच्यातील भेद हा अज्ञानजन्य ठरतो वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना अद्वैत वेदांताच्या या मूलभूत तत्वाचे सामाजिक व नैतिक रुपांतर आहे.

**अहिंसा व करुणेचे तत्व:-** 'वसुधैव कुटुम्बकम' या संकल्पनेचा नैतिक पाया हा अहिंसा व करुणा या मूल्यावर आधारित आहे. बौद्ध तत्वज्ञानातील करुणा आणि जैन तत्वज्ञानातील अहिंसा व अनेकान्तवाद हे या संकल्पनेचे पूरक विचार आहेत. सर्व जीवाप्रती दया व सहानुभूती हीच या तत्वज्ञानाची गाभा आहे. नैतिक मूल्यांना यामध्ये जोपासना केली आहे. बौद्ध तत्वज्ञानातील करुणा ही दुःखी जीवांच्या वेदना स्वतःच्या समजून त्यांना मुक्त करण्याची भावना आहे. ही दोन्ही मूल्य वसुधैव कुटुम्बकम मध्ये एकत्रितपणे दिसून येतात, जर संपूर्ण जग एक कुटूंब असेल तर कोणत्याही जीवाला इजा करणे हे नैतिकदृष्ट्या अयोग्य ठरते. त्यामुळे ही संकल्पना मानवी वर्तनाला करुणा व संवेदनशीलतेची दिशा देते.

**नैतिक सार्वत्रिकता :-** वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना नैतिक मूल्यांना देश, धर्म किंवा संस्कृती यांच्या सीमामध्ये अडकवत नाही. सत्य, न्याय, करुणा, सहिष्णुता आणि सह-अस्तित्व ही मूल्ये सार्वत्रिक आहेत. तात्विकदृष्ट्या हा विचार नैतिक सार्वत्रिकता पुरस्कार करतो. म्हणजेच नैतिकतेच मापन सर्व मानवांसाठी समान असावी ही भूमीका आधुनिक मानवाधिकार संकल्पनेशीही सुसंगत आहे. त्यामुळे वसुधैव कुटूबकंम ही संकल्पना केवळ पारंपारिक नव्हे, तर आधुनिक नैतिक विचाराशी सुसंगत ठरते. सहानुभूती, परोपकार आणि सहकार्यावर आधारित सुंसंवादी समाजासाठी आवश्यक आहेत. सहानुभूती करून सहअस्तित्व आपल्याला इतरांशी खोलवर जोडल्यास, त्यांच्या भावना आणि अनुभव ही नैतिकतेला आधार देते.

**मानवता आणि वसुधैव कुटुम्बकम :-** मानव व सामाजिक प्राणी असून मानवतेवरच समाजाची उभारणी झाली आहे. मानवता म्हणजे केवळ माणूस असणे नव्हे तर दुस-याच्या दुःखात सहभागी होणे, सहवेदना ठेवणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि सर्व सजीवाप्रती आदर भाव ठेवणे होय. मात्र आजच्या युगात मानवतेची जागा स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिक सुखानी घेतली आहे. अशा परिस्थितीत मानवतेची पुर्नस्थापना करणे ही काळाची गरज बनली आहे. प्राचीन भारतीय तत्वज्ञानातून उद्भवलेली

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

'वसुधैव कुटुबकंम' ही संकल्पना मानवता निर्माण करण्यासाठी एक प्रभावी वैचारिक अधिष्ठान प्रदान करते. संपूर्ण पृथ्वी एकच कुटूंब आहे. ही भावना माणसा-माणसामधील दुरावा कमी करुन सहानुभूती, प्रेम, बंधुता, वात्सल्य, आदर, समंजस्य वाढवते. भारतीय तत्वज्ञानात मानव आणि निसर्ग यांच्यात मूलभूत विभाजन मानले जात नाही. पंचमहाभूतांपासून मानवाची निर्मिती झाली आहे. हि कल्पना मानवाला निसर्गाचा अविभाज्य घटक मानते. वसुधैव कुटुबकंम ही संकल्पना मन, वनस्पती आणि पर्यावरण यांना एकाच कुटुंबाचा भाग मानते. आजचे जग जागतिकारणात तांत्रिक प्रगती आणि परस्परावलंबाने जोडले गेले आहे. निसर्गातून मानवाला शांतता मिळते. मानवता निर्माण होण्यासाठी परकेपणाचा नाश होणे, करुणा व सहानुभूतीचा विकास सहिष्णुता व समावेशकता, सामाजिक जबाबदारीची जाणीव, निसर्ग प्रेम, दुर्बल घटकांसाठी मदतीची भावना, पर्यावरण संरक्षण, जागतिक माहामारी, समतेवर आधारित समाजरचना याची जाणीव होणे गरजेचे आहे.

**शांतता आणि वसुधैव कुटुंबकम :-** जर संपूर्ण जग एक कुटूंब मानले तर युद्ध निरर्थक ठरते. महाउपनिषदातील प्राचीन भारतीय विचार जागतिक शांतता, बंधुभाव आणि एकता दर्शवितो हे तत्व जात, धर्म, सीमा ओलांडून एकमेकाबद्दल आदर आणि समजूतदारपणा वाढवल्यास, तसेच संघर्ष कमी करुन सहकार्याने शांतता निर्माण होवू शकते. मानव समाज विविधतेने नटलेला आहे. सामाजिक शांततेसाठी परस्पर सह अस्तित्व, सहिष्णुता आणि प्रेम आवश्यक आहे. वसुधैव कुटुम्बकम माणसाला स्वार्थापलिकडे नेवून परमार्थाचा विचार करायला प्रवृत्त करते. गरीबी, भूक, अन्याय, युद्ध यासारख्या केवळ प्रेक्षक म्हणुन न पाहता त्यावर उपाय शोधण्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात देशामधील अंतर कमी झाले असले तरी मनातील दुरावा वाढतांना दिसते. एकूणच सामाजिक शांततेसाठी केवळ कायदे किंवा व्यवस्था पुरेशी नसून माणसाच्या विचारसरणीत परिवर्तण होणे आवश्यक आहे. वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना माणसाला व्यापक दृष्टिकोन देते. आपसातील भेदभाव विसरायला शिकविते आणि प्रेम, करुणा व बंधुतेच्या मूल्यांना बळकटी देते. जर वसुधैव कुटुम्बकम ही भावना आचरणात आली तर समाजाताच नव्हे तर संपूर्ण जगात शांतता व मानवतेचे नवे पर्व उभे राहू शकते.

**प्रगतीसाठी वसुधैव कुटुम्बकम :-** प्रगती म्हणजे केवळ आर्थिक वाढ किंवा भौतिक सुविधा मिळवणे एवढाच अर्थ नाही. खरी प्रगती म्हणजे सामाजिक समता, नैतिक मूल्य, मानवी विकास आणि पर्यावरणीय समतोल यांचा समन्वय होय. विकासाचा लाभ केवळ काही लोकांपुरता मर्यादित न राहता सर्वापर्यंत पोहचला पाहिजे. गरीब, दुर्बल, महिला, अल्पसंख्यचांक यांचा विकासात सहभाग असणे हीच खरी प्रगती आहे. सामाजिक समता, मानवी मूल्यांची जोपासना, शिक्षण व निरोगी जीवन, शांतता व सुरक्षितता, स्त्री-पुरुष समानता ही काळाची गरज आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मक युगात समाज अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. सामाजिक विषमता, धार्मिक संघर्ष, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा -हास आणि मानवी संबंधातील दुरावा ही आधुनिक समाजाची प्रमुख आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर प्राचीन भारतीय तत्वज्ञानातून उद्भवलेली 'वसुधैव कुटुम्बकम' ही संकल्पना समाज शांततेसाठी व प्रगतीसाठी एक प्रभावी वैचारिक आधार प्रदान करते.

## मानवता, शांतता व शाश्वत प्रगतीसाठी उपाययोजना :-

**संवाद वाढवणे :-** शांततेसाठी संवाद हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जेव्हा राष्ट्रे समाज किंवा व्यक्ती आपापल्या समस्या द्वेषा एवजी संवादातून सोडवतात तेव्हा संघर्षाची तीव्रता कमी होते. वसुधैव कुटुम्बकम ही सकंल्पना संवादाला महत्व देते. कारण कुटूंबातील सदस्य एकमेकांशी बोलून गैरसमज दूर करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा, परिषद, शांततादूत याद्वारे संवाद वाढवल्यास युद्ध टाळता येते.

**शस्त्र स्पर्धा कमी करणे :-** आपल्याला समाजात शांतता वाढावी असे वाटत असेल तर शस्त्रातील स्पर्धा कमी करावी. आज अनेक देश प्रचंड प्रमाणात शस्त्रसाठा करत आहेत. ही शस्त्रस्पर्धा शांततेस मोठा धोका निर्माण करते. वसुधैव

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

कुटूबकमच्या दृष्टीने संपुर्ण एक कुटूंब असल्याने शस्त्रांनी सज्ज होणे म्हणजे स्वतःचाच कुटूंबावर धोका निर्माण करणे होय. त्यामुळे शस्त्र नियंत्रण, अन्य वस्त्र विरोधी करार आणि लष्करी खर्च कमी करुन तो खर्च शिक्षण, आरोग्य व विकासासाठी वापरणे आवश्यक आहे.

**मूल्यधिष्ठित शिक्षण देणे :-** शांतता टिकण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात. माणसाच्या मानात मूल्ये रुजणे गरजेचे असते. जर प्राथमिक स्तरातून विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षण दिले तर सुरवातीपासूनच विध्यार्थांमध्ये शांततेचे बीज रुजु शकते. शांतता ही एका-ऐकी निर्माण होणारा घटक नाही. बालपणापासून शांततेचे बाळकडू पाजावे लागते. मूल्यधिष्ठित शिक्षणातुन करुणा, सहिष्णुता, अहिंसा, परस्पर आदर याचा विकास होतो. शालेय व उच्च शिक्षणात वसुधैव कुटुम्बकम यांचा समावेश केल्यास पुढील पिढी शांतताप्रिय बनेल.

**पर्यावरण संरक्षण :-** पर्यावरणीय -हास झाल्यामुळे पाणी, अन्न आणि संसाधनावरुन संघर्ष वाढत आहेत. वसुधैव कुटूबंकम ही संकल्पना मानव आणि निसर्ग यांना एकाच कुटूबांचा भाग मानते. निसर्गाचा -हास म्हणजे आपल्या कुटूंबाचा -हास होय. त्यामुळे पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि नैसर्गिक संसाधनाचा योग्य वापर केल्यास भविष्यातील संघर्ष टाळता येतील आणि शांतता प्रस्थापित होईल.

**जागतिक शांतता व आंतरराष्ट्रीय सहकार्य :-** आधुनिक जगात युद्धे, दहशतवाद, शस्त्रस्पर्धा आणि राजकीय अस्थिरता ही जागतिक शांतते समोरील मोठी आव्हाने आहेत. संकुचित शब्दवाद आणि स्वार्थी राजकारणामुळे आंतरराष्ट्रीय संबंध तणावपूर्ण बनतात. वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना शब्दाचा सीमा ओलांडून मानवतेचा विचार करते. सर्व राष्ट्र एक कुटूंबाचा भाग आहेत. संयुक्त राष्ट्रसंघ, युनेस्को यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मूलभूत तत्वामध्येही या संकल्पनेचे प्रतिबिंब आढळते. आजच्या काळातील महामारी, हवामान बदल, दहशतवाद यासारख्या समस्या कोणत्याही एका देशाने एकटयाने सोडवू शकत नाही. वसुधैव कुटूंबकम ही भावना आंतरराष्ट्रीय बळ देते. देशानी परस्पर मदत, ज्ञानाची देवाण-घेवाण आणि संयुक्त प्रयत्न केले तर जागतिक शांतता अधिक मजबूत होईल. संयुक्त राष्ट्रसंघा सारख्या संस्थाचा यासाठी प्रभावी वापर करणे गरजेचे आहे.

**सहिष्णुता आणि संस्कृतिक आदर :-** विविध धर्म, भाषा आणि संस्कृती असणे ही मानवजातीची संपत्ती आहे. परंतु असहिष्णुतेमुळे संघर्ष निर्माण होते. वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना विविधतेत एकता शिकवते. इतरांचा श्रद्धा, परंपरा व संस्कृतींचा आदर केल्यास समाजात शांततामय सहअस्तित्व निर्माण होते. जागतिक शांततेची सुरवात व्यक्तीपासून होते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या विचार, शब्द आणि कृतीत अहिंसा व सहिष्णुता पाळली तर समाजात शांतता निर्माण होईल. संवाद, शिक्षण, सहकार्य, पर्यावरण संरक्षण आणि मूल्यसंवर्धन या सर्वाचा पाया वसुधैव कुटुम्बकम आहे.

**सामाजिक ऐक्य व बंधुता :-** वसुधैव कुटुम्बकम संकल्पना समाजातील विविध घटकांमध्ये परस्पर विश्वास व बंधुतेची भावना निर्माण करते. जात, धर्म, भाषा, वंश आणि राष्ट्र या आधारावर निर्माण होणारे सामाजिक भेद, समाजातील संघर्षाचे मूळ कारण ठरतात. ही संकल्पना 'आपण' आणि 'ते' असा भेद न करता सर्व मानव एकाच कुटूंबाचे सदस्य आहेत अशी दृष्टी देते. यामुळे सामाजिक समरसता वाढते. सामूहिक जबाबदारीची भावना विकसित होते आणि सामाजिक ताणतणाव कमी होण्यास मदत होते. सामाजिक ऐक्य हे समाज प्रगतीचे मूलभूत अधिष्ठान आहे.

**सामाजिक व आर्थिक समता :-** समाज प्रगतीचा खरा मापक म्हणजे समाजातील दूर्बल घटकांचे जीवनमान सुधारले आहे की नाही हे होय. आज जगात आर्थिक विषमता वाढत असून श्रीमंत आणि गरीब यातील दरी अधिक रुंद होत आहे. वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना सर्व मानवांना समान मानते. या दृष्टीकोनातून संसाधनाचे न्याय वितरण, सामाजिक न्याय,

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

गरिबी निर्मूलन आणि वंचित घटकाच्या सक्षमीकरणावर भर दिला जातो. जर समाजातील प्रत्येक व्यक्तीला कुटूंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली गेली, तर सामाजिक शोषण आणि अन्याय कमी होण्यास मदत होईल.

**शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन :-** शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. केवळ कौशल्याधिष्ठित किंवा रोजगाराभिमुख शिक्षण समाज प्रगतीसाठी पुरेसे नाही. मूल्यधिष्ठित शिक्षणाची आवश्यकता आहे. वसुधैव कुटुम्बकम संकल्पनेचा शिक्षणात समावेष केल्यास विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुता, करुणा, सामाजिक जबाबदारी, जागतिक नागरिकत्वाची भावना निर्माण होते. आजच्या काळात व्यक्ति केंद्री जीवनशैली, भौतिकवाद आणि स्पर्धात्मक वाढत आहे. यामुळे सहकार्यापेक्षा स्पर्धेला अधिक महत्व दिले जाते. अशा परिस्थितीत वसुधैव कुटुम्बकम संकल्पना व्यवहारात आणणे काळाची गरज आहे.

**विविधता आणि एकतेला प्रोत्साहन देणे :-** वसुधैव कुटुम्बकमचे तात्विक आधार आपसातल्या विविधता मानवी अनुभवांना समृद्ध करते आणि एकतेला प्रोत्साहन देते. प्रत्येक संस्कृती, परंपरा आणि श्रद्धा प्रणाली मानवी संस्कृतीच्या समृद्धतेत योगदान देणारी अद्वितीय आणि मूल्ये प्रदान करते. या विविधतेला स्वीकारुन आपण एकतेला प्रोत्साहन देवू शकतो. परस्परावलंबनाला ओळखण्यासाठी आपल्या निर्णयाबददल अधिक प्रमाणिक दृष्टिकोन बाळगण्याची आवश्यकता आहे. इतरांच्या हितासाठी निस्वार्थ कृतींना प्रोत्साहन दिल्याने अधिक काळजी घेणारा आणि आधार देणार समुदाय निर्माण होतो. 'विविधतेतून एकता' हा मंत्र आपण स्विकारला पाहिजे.

## निष्कर्ष :-

'वसुधैव कुटुम्बकम' ही संकल्पना समाज प्रगतीसाठी नैतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय अधिष्ठान प्रदान करते. समाज शांतता ही केवळ कायदे कींवा शक्तीच्या आधारावर प्रस्थापित होवू शकत नाही. तर सामाजिक ऐक्य व बंधुता, आर्थिक समता, सहिष्णुता, सांस्कृतिक आधार, पर्यावरण संरक्षण, मूल्याधिष्टित शिक्षण या सगळ्यांचे समाजात नियोजन करणे आवश्यक आहे. बंधुत्वावर आणि स: अस्तित्वावर आधारित असावी लागते. समाज शांततेसाठी जर व्यक्ती, समाज आणि राष्ट्रांनी ही भावना स्वीकारणी तर द्वेष, हिंसा आणि संघर्ष यांना आळा घालून शांत, समतोल आणि सुसंवादी समाज निर्माण करणे शक्य आहे. मानवतेचा नैतिक पाया, जागतिक शांततेचा शाश्वत मार्ग आणि समताधिष्ठीत प्रगतीचे दिशा दर्शन करते. आजल्या संघर्षग्रस्त व विभाजित जगात हा विचार अधिकच उपयुक्त ठरते. त्यामुळे वसुधैव कुटुम्बकम ही केवळ भारतीय तत्वज्ञानाची देणगी नसून संपुर्ण मानवजातीसाठी एक सार्वत्रिक मूल्य प्रणाली आहे.

## संदर्भसूची :-

महाउपनिषद (संस्कृतग्रंथ)
राधाकृष्णन, स. (१९६७). Indian Philosophy. Oxford University Press.
गांधी, मो.की. (१९४८), सत्याचे प्रयोग (My Experiments with Truth) नवजीवन प्रकाशन
संयुक्त राष्ट्रसंघ. (२०१५) Transforming our World: The 2030 Agenda for Sustainable Development.
शर्मा, च. (२०१०). भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास. मोतीलाल बनारसीदास.
नाईक, वि. (२०१८). शाश्वत विकास आणि भारतीय विचार परंपरा. भारतीय समाजशास्त्र जर्नल.